83

Competent Authority, (U.L.C.)
Inward No. 978
Date 18 JUN 2016
Tal.

नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ अन्वये संपादित / सूट दिलेल्या जमीनी व त्यावरील नोंदीबाबत....

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
शासन निर्णय क्रमांक : नाजक-२०१४/प्र.क्र.९५/नाजकधा-३
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०९ जून, २०१६.

**वाचा :** मंत्रीमंडळ उप समितीची बैठक दि.२९.७.२०१५ चे इतिवृत्त दि.२०.८.२०१५

**प्रस्तावना :-**

नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) निरसन अधिनियम, १९९९ नुसार कलम २० खाली पारीत करण्यात आलेले आदेश व त्यावरील कार्यवाही आणि कलम १०(३) व १०(५) चा कार्यवाही करून ताबा घेण्यात आलेल्या जमीनींना संरक्षण प्राप्त आहे.

सद्य:स्थितीत, नाजकधा निरसन अधिनियमाची अंमलबजावणी सुरू असताना बृहन्मुंबई नागरी समुहात काही प्रकरणी नाजकधा अधिनियमाच्या कलम २० अन्वये गृहबांधणीसाठी सूट देण्यात आलेली असताना सक्षम प्राधिकारी कार्यालयामार्फत अशा सूट दिलेल्या जमिनींवरदेखील अनावधनाने कलम १०(३) व १०(५) अन्वये कार्यवाही करण्यात येऊन योजनेखालील जमिनीचा ताबा घेण्यात आल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. नाजकधा अधिनियम, १९७६ च्या कलम २० खाली अतिरिक्त जमिनींना संपादन करण्यापासून सूट असते, अशा प्रकरणांमध्येदेखील सूटीचे आदेश कायम असतांना सक्षम प्राधिकाऱ्याने जमीन ताब्यात घेण्याची केलेली कार्यवाही अनुचित ठरत असल्याने दि.२९.७.२०१५ रोजी आयोजित मंत्रीमंडळ उप समितीच्या बैठकीत मान्यता प्राप्त झाल्यानुसार याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

(२) नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) निरसन अधिनियम, १९९९ नुसार कलम २० अन्वये मंजूर करण्यात आलेल्या गृहबांधणी योजनांना संरक्षण आहे. अशा योजनेखालील क्षेत्राबाबत नाजकधा कलम १०(३) व १०(५) नुसार कार्यवाही करुन अशा क्षेत्रावर महाराष्ट्र शासनाच्या नावाची नोंद करण्यात आली असेल तर अशा



Scanned with CamScanner

प्रकरणी केलेली संपादनाची कार्यवाही अयोग्य ठरत असल्याने, त्या जमीनीच्या अधिकार अभिलेखात घेण्यात आलेली "महाराष्ट्र शासनाची" नोंद कमी करून त्या जमिनीवर फक्त नाजकधा कलम २० खालील योजनेची नोंद ठेवण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(समाधान खटकाळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. अपर जिल्हाधिकारी / उप जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, सर्व नागरी समुह.
२. प्रधान सचिव (नगर विकास-१) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२.
३. उप सचिव (नाजकधा) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२.
४. कक्ष अधिकारी नाजकधा-१.
५. कक्ष अधिकारी नाजकधा-२.
६. निवडनस्ती, नाजकधा-३.

Scanned with CamScanner